MHWS070019682022

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल तारीख | : | २७.०९.२०२२ | | |
| नोंदणी तारीख | : | २७.०९.२०२२ | | |
| निकाल तारीख | : | ०१.०८.२०२६ | | |
| कालावधी | : | वर्षे | महिने | दिवस |
| | | ०३ | १० | ०४ |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कारंजा (लाड) यांचे न्यायालयात**
**(पीठासीन अधिकारी : पी. डी. देवरे )**

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ३१२/२०२२**
**निशाणी क्र. २०**

सौ. पुजा अतुल इंगोले, }
वय अं. वर्षे २३, धंदा – निल }
राहणार– किरण वानखडे, }
तुषार कॉलनी, कारंजा, }
ता. कारंजा (लाड) जि. वाशिम } **...अर्जदार**

**विरुध्द**

अतुल श्रीकांत इंगोले }
वय अं. वर्षे ३५, धंदा – व्यवसाय }
राहणार– आसावरी–अ फ्लॅट नं. २२०७, }
नांदेड सिटी, सिंहगड रोड, }
पुणे– ४११ ०४१ } **...गैरअर्जदार**

---

**अर्जदारतर्फे मा. विधीज्ञ : श्री. डी. के. पिंजरकर, श्री. एस. के. उंडाळ,**
**श्रीमती ज्योती के. बाजड**

**गैरअर्जदारातर्फे मा. विधीज्ञ : श्री. एस. जी. चौधरी**

---

# न्यायनिर्णय

(आज दिनांक ०१.०८.२०२६ ई. रोजी घोषीत)

अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५(१) अन्वये पोटगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

**अर्जदाराचे म्हणणे थोडक्यात खालील प्रमाणे** :

०२. अर्जदार व गैरअर्जदार यांचा विवाह दिनांक २२/०२/२०२२ रोजी हिंदू रितीरिवाजानुसार कारंजा, ता. कारंजा, जि. वाशिम येथे झाला. सदर विवाहसंबंध अद्यापपावेतो कायम आहेत.

०३. लग्नानंतर अर्जदार गैरअर्जदाराच्या वाशिम येथील संयुक्त कुटुंबात ज्यामध्ये गैरअर्जदार, त्याचे आईवडील व बहिण यांच्यासोबत नांदण्यासाठी गेली. अर्जदाराच्या वडीलांनी लग्नात अर्जदाराला ५५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने दिले व पंधरा लाख रुपये लग्नासाठी खर्च केले. अर्जदाराने तिला मिळालेले सोन्याचे दागिने व भेटवस्तू स्वतःसोबत गैरअर्जदाराच्या घरी नेल्या.

०४. अर्जदाराने पुढे असे कथन केले आहे की, लग्नाच्या आठ दिवसानंतर गैरअर्जदार, त्याचे आईवडिल व बहिणी या सर्वांनी अर्जदाराला वडीलांकडून हुंडा म्हणुन दहा लाख रुपये घेवून येण्याची मागणी केली. त्यावेळी अर्जदाराने गैरअर्जदार यांना सांगितले की, 'वडिलांनी लग्नात खूप खर्च केला आहे आणि ते ₹ १०,००,०००/- देऊ शकत नाहीत'. त्यावर गैरअर्जदार हे अर्जदारास 'तुझ्या वडिलांकडे पुरेशी शेतजमीन आहे आणि ते सहजपणे ₹ १०,००,०००/- देऊ शकतात' असे म्हणुन हुंड्यासाठी

अर्जदारास वाईट वागणूक देण्यास सुरुवात केली.

०५. अर्जदाराने पुढे असे कथन केले आहे की, वाशिम येथे राहत असताना गैरअर्जदाराला दारू पिण्याची सवय असल्याचे तिला समजले. गैरअर्जदार दररोज रात्री दारू पिऊन यायचा व हुंड्याच्या कारणावरून तिला वाईट वागणूक देत होता, तिचा अपमान करत होता. गैरअर्जदार आईवडीलांसोबत पुणे येथे राहतो व तिथे एएसएम एनर्जी या नावाने डेस्टिनेशन सेंटर, नांदेड शहर, सिंहगड रोड, पुणे येथे औद्योगिक उपकरणांचे सुटे भाग आणि देखभाल इत्यादीचा व्यवसाय करतो. दि. ०८/०३/२०२२ रोजी अर्जदार ही गैरअर्जदार, त्याचे आईवडील आणि बहीण यांच्यासह पुणे येथे राहायला गेली होती. पुणे येथे राहत असतांना गैरअर्जदार व त्याचे कुटूंबिय अर्जदारास अधिक त्रास देत होते. तिथे गैरअर्जदार रात्री उशिरा दोन वाजता येऊन हुंड्याच्या किंवा इतर किरकोळ कारणावरून अर्जदारसोबत भांडण करून दारूच्या नशेत अर्जदाराला मारहाण करत होता, तिचा अपमान करत होता. तिने गैरअर्जदाराच्या गैरवर्तनाबद्दल त्याचे आईवडीलांना सांगितले असता त्याच्या आईवडीलांनी तिला 'बेअक्कल' असे म्हणुन अपमानित केले, शिवीगाळ केली व पैसे आणायला सांगितले. गैरअर्जदाराची बहिण नामे शितल दिलेश गोरे ही मुंबईत राहत होती. परंतु अर्जदाराच्या लग्नाच्यावेळी ती त्यांच्यासोबत राहायला गेली. गैरअर्जदाराची बहिण पुण्यात राहत असतांना ती अर्जदाराविरुध्द गैरअर्जदाराला भडकावुन देत होती.

०६. अर्जदाराने पुढे असे कथन केले आहे की, गैरअर्जदार पुणे येथे

असतांना रात्री सुमारे ०२.०० वाजता दारूच्या नशेत घरी येत असे व त्याबाबत अर्जदाराने गैरअर्जदार यास घरी उशिरा येण्याबद्दल आणि दारू पिण्याबद्दल विचारले असता गैरअर्जदार अर्जदारास 'तिला या सर्व गोष्टी सहन कराव्या लागतील, नाहीतर त्याच्याकडे भरपूर पैसे आहेत आणि पुण्यात मुलींची कमतरता नाही' असे म्हणत होता. परंतु गैरअर्जदार याच्यात बदल होईल आणि त्याला सुबुद्धी येईल या आशेने अर्जदार सर्व त्रास सहन करत होती. परंतु अर्जदाराला गैरअर्जदाराचा त्रास असह्य झाल्याने तिने तिच्या पालकांना फोन करून कळवले. त्यावरून अर्जदाराचे पालकांनी अर्जदाराला करंजा येथे परत आणण्यासाठी अर्जदाराचे मामा महादेव वासुदेव इंगळे (रा. अकोला) यांना पुण्याला पाठवले. त्यावेळी गैरअर्जदार याच्या आईवडीलांनी त्याला विरोध केला, परंतु दि. ११/०४/२०२२ रोजी अर्जदाराचे मामा अर्जदाराला कारंजा येथे घेवून आले.

०७. अर्जदाराने पुढे असे कथन केले आहे की, अर्जदाराने तिला होणा–या त्रासाबद्दल तिच्या आईवडीलांना सांगितले असता अर्जदाराचे आईवडीलांनी गैरअर्जदार व त्याचे पालकांना समजावुन सांगण्यासाठी अनेक वेळा कॉल केला, संदेश पाठविला परंतू गैरअर्जदार यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यानंतर दि. ०४/०७/२०२२ रोजी, अर्जदार तिचे आईसोबत पुणे येथे गैरअर्जदाराकडे गेली. त्यावेळी अर्जदाराचे आईने गैरअर्जदार व त्याचे आईवडिलांना अर्जदाराला नांदविणेसाठी घेवुन आल्याचे व तिला चांगले वागविण्याची व तिला त्रास न देण्याबाबत विनंती केली असता गैरअर्जदारांनी त्यास नकार दिला व अर्जदाराला नांदायचे असल्यास आधी दहा लाख रुपये घेवुन येण्यास सांगितले व तसे न केल्यास अर्जदाराचे

आईवडिलांना व अर्जदाराला जिवाने मारण्याची धमकी दिली. त्यामुळे अर्जदार व तिची आई परत कारंजा येथे आले.

०८. अर्जदाराने पुढे असे कथन केले आहे की, दि. १६/०८/२०२२ रोजी गैरअर्जदार यांनी अर्जदाराला केलेली हुंडा मागणी व छळाविरुध्द अर्जदाराने गैरअर्जदार व त्याच्या कुटूंबियाविरुध्द पोलिस स्टेशन, कारंजा येथे तक्रार दाखल केली असुन सदर प्रकरण आज रोजी प्रलंबित आहे.

०९. अर्जदाराने पुढे असे कथन केले आहे की, दि. ११/०४/२०२२ पासुन अर्जदार ह्या त्यांच्या आईवडिलांसोबत कारंजा येथे राहात असुन गैरअर्जदार याने त्यांची कोणतीही काळजी घेतली नसुन त्यांच्याकडे पुर्णपणे दुर्लक्ष केलेले आहे. अर्जदाराचे बी.एच.एम.एस. पर्यन्तचे शिक्षण झाले असुन त्या खामगाव येथे इंटरर्निशिप करतात. अर्जदाराला उत्पन्नाचे कोणतेही साधन नसुन त्या स्वतःच्या उपजिवीकेसाठी त्यांच्या आईवडीलांवर विसंबुन असुन तेच अर्जदाराचे पालनपोषण करीत आहे. याउलट, गैरअर्जदार हा श्रीमंत व्यावसायीक असुन तो पुणे येथे ओएसएम एनर्जि नावाने नांदेड सिटी, सिंहगड रोड येथे औद्योगिक उपकरणांच्या सुट्या भागाचा व्यवसाय करतो. त्यापासुन गैरअर्जदार दरमहा ₹ २,००,०००/– कमावितो.

१०. त्यामुळे अर्जदार हिने स्वतःकरिता गैरअर्जदाराकडून अन्नवस्त्र व उदरनिर्वाहकरिता ₹ ४०,०००/– दरमहा अर्ज दाखल तारखेपासून मिळावे अशी मागणी केली आहे. तसेच प्रस्तुत अर्जाचा खर्च म्हणुन ₹

२०,०००/– वेगळे मिळण्याकरिता मागणी केलेली आहे.

**गैरअर्जदाराचा जबाब :–**

११. गैरअर्जदाराने अर्जाकामी हजर होवून नि. क्र. ०९ वर त्याचे म्हणणे दाखल केले. गैरअर्जदाराने अर्जदार हिचे सोबत दि. २२/०२/२०२२ रोजी विवाह झाल्याची बाब मान्य करुन इतर सर्व कथने अमान्य केलेली आहेत.

१२. गैरअर्जदाराचा असा बचाव आहे की, त्याचे व अर्जदाराचे लग्न दि. २२/०२/२०२२ रोजी हिंदू रिती रिवाजाप्रमाणे कारंजा येथे पार पडले. त्यानंतर संध्याकाळच्या वेळी गैरअर्जदार अर्जदाराला घेऊन वाशिम येथे घेउन आले. त्यानंतर दि. २४/०२/२०२२ रोजी अर्जदार ही सत्यनारायणाच्या कार्यक्रमाकरिता कारंजा येथे गेली. त्यानंतर दि. २६/२/२०२२ गैरअर्जदार हा अर्जदाराला कारंजा वरून वाशीम येथे घेऊन आला. दि. २८/०२/२०२२ रोजी गैरअर्जदाराकडे गोंधळाचा कार्यक्रम होता. त्यानंतर दि. २९/०२/२०२२ रोजी अर्जदार व गैरअर्जदाराचे मधु चंद्राच्या रात्री संपूर्ण रूमची सजावट अर्जदार व गैरअर्जदाराच्या नातेवाईकांनी करून दिली. परंतु मधु चंद्राच्या रात्री अर्जदाराने गैरअर्जदाराला शारीरिक संबंध प्रस्थापित करू दिले नाही. त्याबाबत गैरअर्जदाराने अर्जदाराला कारण विचारले असता अर्जदाराने सांगितले की, 'तिचे लग्न तिच्या इच्छेविरुद्ध लावून देण्यात आले आहे'. त्यावर गैरअर्जदाराने अर्जदाराला म्हटले की, 'माझ्या जीवनाशी तुला खेळण्याचा कोणताही अधिकार नसतांना तू माझी व माझ्या कुटुंबाची

फसवणूक केली आहे'. त्यावर अर्जदाराने म्हटले की, 'माझे प्रेम इतर व्यक्ती सोबत असल्यामुळे मी तुमच्या सोबत शारीरिक संबंध प्रस्थपित करू शकत नाही'. त्या रात्री गैरअर्जदार रात्रभर जागाच राहिला होता. त्यानंतर दुसरे दिवशी गैरअर्जदाराने सदरची बाब त्याच्या वडिलांना सांगितली त्यावरून गैरअर्जदाराच्या वडिलांनी गैरअर्जदाराचे मामा डॉ. शाम गाभणे यांना घरी बोलावून घेतले व वरील बाबींवर चर्चा केली. त्यानंतर गैरअर्जदाराने अर्जदाराचे आतेभाऊ यांना वाशिम येथे बोलावून घेतले व गैरअर्जदाराला कारंजा येथे रवाना केले.

१३. गैरअर्जदाराने पुढे कथन केले की, दि. ०२/०३/२०२२ रोजी गैरअर्जदाराचे वडील व मामा हे कारंजा येथे गेले व अर्जदार जी काही मधु चंद्राच्या रात्री बोलली त्याबाबत अर्जदाराच्या वडिलांना माहिती दिली. त्यावरून अर्जदाराच्या वडिलांनी गैरअर्जदाराच्या वडिलांना मुलीला नांदण्या करिता पाठविण्याचे आश्वासन दिले. त्यावरून दि. ०३/०३/२०२२ रोजी अर्जदाराच्या वडिलांनी गैरअर्जदाराला फोन केला व अर्जदारास घेऊन जाण्यास सांगितल्यावरुन गैरअर्जदार दि. ०३/०३/२०२२ रोजी अर्जदाराला कारंजा येथुन वाशिम येथे घेऊन आला. त्यानंतर दि. ०४/०३/२०२२ ते ०६/०३/२०२२ पर्यंत अर्जदार ही नेहमी झोपूनच राहत होती. घरात कोणत्याही व्यक्ती सोबत बोलचाल करत नव्हती. गैरअर्जदाराच्या वडिलांनी गैरअर्जदाराला म्हटले की, 'अर्जदाराला तू देव दर्शनासाठी बाहेर घेऊन जा'. त्यावरून दि. ०७/०३/२०२२ रोजी गैरअर्जदार हा अर्जदाराला सोबत घेऊन तपोवन व शेगाव येथे घेऊन गेला होता व दि. ०८/०३/२०२२ रोजी परत आला होता. त्यानंतर दि.

०९/०३/२०२२ रोजी गैरअर्जदार हा अर्जदाराला घेऊन पुणे येथे गेला. त्यानंतर दि. १०/०३/२०२२ रोजी गैरअर्जदार ह्याने अर्जदाराला पुणा येथील मॉल मध्ये शॉपिंग करण्याकरिता घेऊन गेला. त्यावेळी अर्जदाराने जवळपास ₹ २०,०००/– ची शॉपिंग केली. अर्जदार ही पुण्याला असतांना स्वयंपाक वैगरे काही करत नव्हती. दि. १५/०३/२०२२ रोजी अर्जदाराची मावशी संपूर्ण परिवारासह गैरअर्जदाराच्या फ्ॅटवर आली होती. त्यावेळी गैरअर्जदाराने त्यांचा संपूर्ण स्वयंपाक केला होता. दि. १६/०३/२०२२ रोजी अर्जदाराची आत्या (उगले) ही गैरअर्जदाराच्या घरी कुटुंबासह आली होती. त्यावेळीसुद्धा गैरअर्जदाराने त्यांचे जेवणाची व्यवस्था केली होती.

१४. गैरअर्जदाराने पुढे कथन केले की, दि. २०/०३/२०२२ रोजी गैरअर्जदाराचे आईवडील हे पुणे येथे आले होते व दि. २१/०३/२०२२ रोजी मुंबई येथे अर्जदाराला मुंबईला फिरण्याकरिता घेऊन गेले होते. ते सर्वजण मुंबईला दि. २३/०३/२०२२ पर्यंत होते व त्याच रात्री मुंबई वरून सर्वजण पुण्याला परत आले होते. दि. २४/०३/२०२२ रोजी गैरअर्जदार व त्यांचे वडील वाशिम येथे महत्वाचे काम असल्यामुळे वाशिम ला आले तेव्हा अर्जदारासोबत गैरअर्जदाराच्या आईला पुणा येथे ठेवले. तेव्हा गैरअर्जदार हे दि. ०२/०४/२०२२ पर्यंत वाशिम येथे राहिले होते. दि. ०३/०४/२०२२ रोजी गैरअर्जदार व त्याचे वडील हे पुणा येथे आले व दि. ०४/०४/२०२२ ला गैरअर्जदाराचे वडील व आई हे वाशिम येथे परत गेले. त्यानंतर अर्जदार ही नेहमी मोबाईल वर चॅटिंग करत होती. त्यामुळे अर्जदाराचे व गैरअर्जदाराचे मोबाईल वरून किरकोळ वाद झाले. त्यावरून गैरअर्जदाराने सदरची बाब अर्जदाराच्या

आईवडिलांना सांगितली. त्यावरून अर्जदाराच्या वडिलांनी दि. १०/०४/२०२२ अर्जदाराचे मामा महादेव वासुदेव इंगळे, रा. अकोला, यांना पुणा येथे पाठविले व त्याच रात्री अर्जदार व तिचे मामा पुण्यावरून कारंजा येथे आले. तेव्हा पासून अर्जदार ही माहेरी राहत आहे. अर्जदाराने गैरअर्जदाराला शारीरिक व मानसिक सुखा पासून वंचित ठेवले आहे.

१५. गैरअर्जदाराने पुणे येथे ए.एस.एम. एनर्जी नावाची फर्म सुरु केली त्याकरिता त्याने पिरॅमल कॅपिटल फाईनंस कडून ₹ ३०,००,०००/– (तीस लाख रुपये) चे कर्ज वडीलाच्या नावाने घेतले. तसेच पुणा येथे एक ऑफिस भाड्याने घेतले असुन त्याचे भाडे ₹ १५,०००/– आहे. गैरअर्जदाराने सदरहू फर्म मागील वर्षीच चालू केली असून त्यापासून आज रोजी कोणतेही उत्पन्न नाही. याउलट, अर्जदार ही बी.एच.एम.एस झालेली असून, उच्च शिक्षित महिला आहे व सध्या ती खामगाव येथे नौकरीवर आहे. तिला जवळपास ₹ ४०,०००/– रुपये पगार आहे व त्या पगारा पासून ती तिच्या सर्व गरजा पूर्ण करू शकते. त्यामुळे तिला खावटी देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

१६. अर्जदार ही जवळपास ३० दिवस गैरअर्जदाराकडे राहिली असुन तिने गैरअर्जदाराला कोणतेही वैवाहिक, मानसिक व शारीरिक सुख दिले नाही. अर्जदार ही नेहमी गैरअर्जदाराला पैशाची मागणी करत होती. अर्जदार व तिचे वडील हे गैरअर्जदाराला ₹ १५,००,०००/– (पंधरा लाख) रुपयाची मागणी करीत होते. उलट अर्जदार व तिचे आईवडिलांनीच गैरअर्जदाराला व त्याच्या कुटुंबाला त्रास दिला आहे. गैरअर्जदाराने कधीही

हुंड्याची व पैशाची मागणी केलेली नाही. अर्जदार ही दि. १०/०४/२०२२ रिजी तिच्या मामा सोबत माहेरी निघून गेली तेव्हा तिने तिच्या अंगावरील दागिने व कपाटातील सर्व कपडे व दागिने व रोख रक्कम ₹ ५०,०००/- माहेरी घेऊन गेली आहे. गैरअर्जदाराने अर्जदाराला कधीही कोणत्याही प्रकारचा त्रास दिलेला नाही. अर्जदार तिच्या इच्छेनुसार गैरअर्जदारापासून विभक्त राहत आहे. त्यामुळे अर्जदाराला खावटी मागण्याचा कोणताही कायदेशीर अधिकार नसुन केवळ गैरअर्जदाराला मानसिक व आर्थिक त्रास देण्याच्या उद्देशाने अर्जदाराने सदरचे प्रकरण दाखल केले असुन ते खर्चासह नामंजूर करण्यात यावे अशी विनंती गैरअर्जदाराने केलेली आहे.

१७. वर नमुद परिस्थितीमध्ये उचित निर्णयापर्यंत पोहचण्याकरीता खालील मुद्दे विचारार्थ येतात, सदर मुद्दयांवर सुसंगत कारणमिमांसेसह निष्कर्ष नोंदविण्यात आले ते खालीलप्रमाणे.

| **अ.नं.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार हे सिध्द करते काय की, गैरअर्जदाराने कोणत्याही योग्य व संयुक्तीक कारणाशिवाय तिचा त्याग करून तिचा उदरनिर्वाह करण्यास नाकारले किंवा दुर्लक्ष केले? | होय |
| २. | अर्जदार हे सिध्द करते काय की, ती स्वतःचे पालनपोषण करण्यास असमर्थ आहे? | होय |
| ३. | अर्जदार हे सिध्द करते काय की, तिचे पालनपोषण करण्यासाठी गैरअर्जदाराकडे पुरेसे | होय |

| | | |
|---|---|---|
| | उत्पन्नाचे साधन आहे? | |
| ४. | अर्जदार हे सिध्द करते काय की, ती गैरअर्जदाराकडून अन्नवस्त्राची व पोटगीची रक्कम मिळण्यास पात्र आहे? असल्यास किती? | अंशत: होय. दरमहा ₹ १५,०००/- अर्ज दाखल तारखेपासुन |
| ५. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

**कारणमिमांसा**

१८. अर्जदाराने तिची बाजु शाबित करण्यासाठी तिचे स्वतःचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र नि.क्र. १० वर, दिनांक १६/०८/२०२२ रोजी पोलिस स्टेशन, कारंजा लाड येथे दिलेला रिपोर्ट आर्टिकल–अ वर दाखल केलेले आहे. तसेच अर्जदाराने निशाणी क्र. ११ वर मालमत्ता व दायित्वाच्या तपशिलाबाबत प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. तिने निशाणी क्र. १५ वर पुरसिस देवून पुरावा बंद केला आहे. गैरअर्जदाराने निशाणी क्र. ०९ वर त्याचे म्हणणे दाखल केले व निशाणी क्र. १२ वर मालमत्ता व दायित्वाच्या तपशिलाबाबत प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. गैरअर्जदार यास पुरेपुर संधी देऊनदेखील त्याने कोणताही पुरावा दिलेला नाही. त्यामुळे निशाणी १ वर आदेश पारीत करुन गैरअर्जदाराचा पुरावा बंद करण्यात आला.

१९. अर्जदारांकरिता मा. विधीज्ञ श्री. डी. के. पिंजरकर यांचा युक्तीवाद ऐकला. वेळोवेळी संधी देवूनही गैरअर्जदाराने युक्तीवाद केला नाही.

**<u>मान्य असलेल्या बाबी</u> :–**

२०. दि. २२/०२/२०२२ रोजी अर्जदार व गैरअर्जदाराचे लग्न झाल्याचे, दि. ११/०४/२०२२ पासुन अर्जदार तिचे माहेरी राहत असल्याचे, अर्जदाराचे शिक्षण होमिओपॅथिक वैद्यक व शल्यचिकित्सा पदवीपर्यंत (बी.एच.एम.एस.) झाल्याचे व गैरअर्जदाराचे शिक्षण अभियांत्रिकी पदवीपर्यंत (बी.ई.) झाल्याचे दोन्ही बाजुस मान्य आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ०१ ते ०४ करिता</u> :–**

२१. वरील सर्व मुद्यांकरीता एकत्रित पुरावा आल्यामुळे पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी वरील सर्व मुद्यांचे विवेचन एकत्रित केले आहे.

२२. अर्जदार हिने तिच्या पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र.१० मध्ये अर्जामध्ये नमूद केलेल्या कथनांचा पुनरउच्चार केला आहे. त्यामुळे पुनरावृत्ती टाळण्यासाठी सदर कथने पुन्हा नमुद केलेली नाही.

२३. अर्जदाराच्या उलटतपासात असे आले आहे की, तिचे शिक्षण होमिओपॅथिक वैद्यक व शल्यचिकित्सा पदवीपर्यंत (बी.एच.एम.एस.) झालेले असुन ती होमिओपॅथिक डॉक्टर आहे. पंचशील होमिओपॅथी कॉलेज, खामगांव येथे तिची इंटर्नशिप पुर्ण झालेली आहे. तिने अर्जामध्ये ५५ ग्रॅम सोन्याबाबत कोणत्याही मुळ पावत्या दाखल केलेल्या नाहीत. लग्नामध्ये तिच्या वडिलांनी रक्कम रूपये पंधरा लाख खर्च केल्याबाबत तिने

अभिलेखावर कोणतेही कागदपत्र अथवा पावत्या दाखल केलेल्या नाही. तिची नणंद शितल हिचे लग्न तिचे व गैरअर्जदाराचे लग्नाअगोदरच झाले आहे. लग्नानंतर शितल तिचे पतीच्या घरी मुंबई येथे राहते. गैरअर्जदाराने अर्जातील नमुद छळ केल्याबाबत व दि. ०४/०७/२०२२ रोजीच्या घटनेबाबत तिने गैरअर्जदार व त्याचे कुटूंबियाविरुध्द पोलिस स्टेशनला कोणतीही तक्रार दिली नाही. तसेच गैरअर्जदार दरमहा ₹ २,००,०००/- कमवितो हे शाबित करण्यासाठी तिने त्याच्या उत्पन्नाचा कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही.

२४. याव्यतिरीक्त तिच्या अर्जातील कथनांप्रमाणे गैरअर्जदाराने तिला कोणताही त्रास दिला नसल्याचा, तिच्याकडे रक्कम ₹ १०,००,०००/- ची मागणी केली नसल्याचा, तिला गैरअर्जदाराशी लग्न करण्याची इच्छा नसल्याचा, तिचे दुस-या मुलावर प्रेम असल्याचा, तिने तिच्या आईवडिलांच्या इच्छेखातर गैरअर्जदाराशी लग्न केल्याचा, लग्नाच्या पहिल्या रात्री तिने गैरअर्जदाराला तिच्याशी शारीरिक संबंध करू दिले नसल्याचा, गैरअर्जदार रोज रात्री ०२.०० वाजता दारू पिवून घरी येत नसल्याचा, तिच्यासोबत हुंड्याची रक्कम व इतर बाबींवरून भांडण करून तिला दारूच्या नशेत मारहाण व शिवीगाळ केली नसल्याचा, गैरअर्जदाराने व त्याचे कुटूंबियांनी तिचा कोणताही छळ केला नसल्याचा, गैरअर्जदार व त्याचे आईवडिलांनी तिला नांदविण्यास नकार दिला नसल्याचा, त्यांनी तिच्याकडे रक्कम ₹ १०,००,०००/- ची मागणी केली नसल्याचा, तसे न केल्यास तिला व तिच्या आईवडिलांना जिवे मारण्याची धमकी दिली नसल्याचा, तिला गैरअर्जदारापासुन घटस्फोट घ्यायचा असल्याचा,

त्यासाठी तिने गैरअर्जदाराकडे रक्कम ₹ १५,००,०००/– ची मागणी केल्याचा, गैरअर्जदाराने त्यास नकार दिल्यामुळे तिने त्याच्याविरुध्द खोटी केस दाखल केल्याचा गैरअर्जदाराचा संपुर्ण बचाव तिने नाकारलेला आहे. मात्र तिने गैरअर्जदारावर त्याच्या आईवडिलांची जबाबदारी असल्याचे मान्य केलेले आहे.

२५. पुर्ण संधी देवूनही गैरअर्जदाराने त्याच्या बचावासाठी कोणताही पुरावा दिला नाही. त्यामुळे नि. क्र. ०१ वरील आदेशाने त्याचा पुरावा बंद करण्याबाबत आदेश करण्यात आला.

२६. अर्जदाराचा तोंडी पुरावा तसेच अभिलेखावरील कागदोपत्री पुरावा यांचे अवलोकन केले असता असे दिसते की, अर्जदार व गैरअर्जदार यांच्यामध्ये विवाह संबंध अद्यापपावेतो कायम आहे. अर्जदार ही गैरअर्जदाराकडे दि. २२/०२/२०२२ रोजी लग्न झाल्यापासुन ते दि. १०/०४/२०२२ पर्यंत म्हणजे फक्त ४७ दिवस राहिली. त्यादरम्यान देखील तिच्यामध्ये व गैरअर्जदारामध्ये वाद निर्माण झाले. अर्जदार ही दि. १०/०४/२०२२ पासुन माहेरी राहत आहे.

२७. अर्जदाराच्या पुराव्यात असे आले आहे की, गैरअर्जदाराने तिचा वेळोवेळी शारिरीक व मानसिक छळ करुन तिच्याकडे हुंड्यापोटी रक्कम ₹ १०,००,०००/– ची मागणी केली. तसेच दि. ०८/०३/२०२२ रोजी अर्जदार व गैरअर्जदार हे पुणे येथे राहयाला गेल्यानंतर तिथे गैरअर्जदार व त्याचे आईवडिलांनी तिला हुंड्याच्या कारणावरुन छोट्या छोट्या गोष्टीवरून दारूच्या नशेत मारहाण करून शिवीगाळ करून तिचा शारीरिक व मानसिक

छळ केला करून नांदण्याकरीता पैशांची मागणी केली व मागणी पुर्ण न केल्यास तिला व तिच्या आईवडिलांना जिवे मारण्याची धमकी दिली. त्यामुळे तिने न्यायालयात अर्ज दाखल केला. अर्जदाराचा सदर पुरावा विनाआव्हानीत राहिला आहे.

२८. गैरअर्जदाराने नि. क्र. ०९ वर त्याचा जबाब दाखल केलेला असला तरी त्याचा बचाव शाबित करण्यासाठी त्याने कोणताही तोंडी अथवा कागदोपत्री पुरावा दिलेला नाही. गैरअर्जदाराने त्याचा बचाव शाबित करण्यासाठी स्वतःचीदेखील साक्ष नोंदवलेली नाही. दावा, अर्ज किंवा जबाब यातील कथने शाबीतीसाठी पुरावा देण्याची जबाबदारी संबंधित पक्षकाराची असते. संबंधित पक्षकाराने त्याच्या म्हणण्याच्या समर्थनार्थ पुरावा दिला नाही तर त्याच्याविरुध्द अनुमान काढता येते. प्रस्तुत प्रकरणातदेखील गैरअर्जदाराने त्याच्या बचाव शाबीतीसाठी कोणताही पुरावा दिला नसल्याने त्याच्या बचावातील कथने शाबित होत नाही. त्यामुळे त्याच्याविरुध्द निष्कर्ष काढता येईल.

२९. वरील सर्व पुराव्यावरुन गैरअर्जदाराचे अर्जदाराने केलेल्या आरोपांबाबत त्यांचे काहीच म्हणणे नाही हे स्पष्ट होते. अर्जदाराचा पुरावा विना आव्हानीत राहिलेला आहे. अर्जदाराची सदरची कथने नाकारण्यासारखी कोणतीही परिस्थिती अभिलेखावर नाही. त्यामुळे अर्जदाराने शपथेवर केलेले कथन व तिचा विनाआव्हानित पुरावा विचारात घेता अर्जदार ही लग्नापासून ते दि. ११/०४/२०२२ पर्यंत गैरअर्जदारासोबत राहत होती, गैरअर्जदाराने तिचा छळ करुन कोणत्याही

योग्य व संयुक्तिक कारणाशिवाय तिचा त्याग करुन तिचा सांभाळ करण्यास नकार दिल्याचे व त्यामुळे दि. ११/०४/२०२२ पासून ती गैरअर्जदारापासून विभक्त राहत असल्याचे व तेव्हापासून गैरअर्जदाराने तिच्या अन्नवस्त्राची कोणतीही तजबीज केली नसल्याचे दिसून येते.

३०. एकंदरीत अभिलेखावरिल पुराव्यावरुन गैरअर्जदार हा अर्जदाराला नांदवत नसल्यामुळे अर्जदार ही तिच्या माहेरी राहत असल्याचे व तिच्याकडे तिच्या उदरनिर्वाहाकरीता पुरेसे साधन नसल्याचे निष्पन्न होते. पोटगी संबंधीच्या कायद्यांचा उद्देश उदरनिर्वाहासाठी आवश्यक आर्थिक आधार मिळावा हा आहे. त्यामुळे अर्जदाराच्या पालनपोषणाची व उदरनिर्वाहची नैतिक व कायदेशीर जबाबदारी गैरअर्जदाराची आहे. वरील परिस्थितीत अर्जदार ही गैरअर्जदाराकडून पोटगी मिळण्यास पात्र आहेत.

३१. अर्जदाराला पोटगीची रक्कम मंजुर करताना अर्जदार व गैरअर्जदाराचे शिक्षण, अर्जदाराच्या गरजा, दैनंदिन खर्च, त्यांचे राहणीमान तसेच गैरअर्जदाराच्या उत्पन्न व जबाबदाऱ्यांचा विचार करावा लागेल.

३२. अर्जदाराने तिच्या स्वतःच्या उत्पन्नाबाबत असे कथन केले आहे की, तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नसुन ती स्वत:चा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे. तिने तिच्या उत्पन्न व दायित्वाचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र. ११ च्या परिच्छेद क्र. ७ मध्ये ती कोणतेही उत्पन्न कर भरत नसल्याबाबतचे नमुद केलेले आहे. परंतु सदर प्रतिज्ञापत्रात तिने तिचे शिक्षण होमिओपॅथिक वैद्यक व शल्यचिकित्सा पदवीपर्यंत (बी.एच.एम.एस.) झाल्याचे मान्य केलेले आहे.

३३. गैरअर्जदाराच्या उत्पन्नाबाबत तिचे असे कथन आहे की, तो श्रीमंत व्यावसायिक असुन तो पुणे येथे ए.एस.एम. एनर्जी नावाने नांदेड सिटी, सिंहगड रोड येथे औद्योगिक उपकरणांच्या सुट्या भागाचा व्यवसाय करतो. त्यापासुन त्याला दरमहा ₹ २,००,०००/– उत्पन्न मिळत. त्यामुळे तो तिला दरमहा ₹ ४०,०००/– अन्नवस्त्राची व पोटगीची रक्कम देण्यास समर्थ आहे. परंतु त्याबाबत तिने त्याच्या निश्चित उत्पन्नाबाबत कोणताही पुरावा दिलेला नाही. तसेच अर्जदार हिला उत्पन्नाचे साधन असल्याबाबतदेखील गैरअर्जदाराने काहीएक पुरावा दिलेला नाही.

३४. गैरअर्जदाराने नि. क्र. ०९ वर त्याचा जबाब दाखल केलेला असला तरी त्याचा बचाव शाबित करण्यासाठी त्याने कोणताही पुरावा दिलेला नाही. त्यामुळे त्याच्या जबाबातील कथने पुराव्याकामी विचारात घेता येणार नाही. गैरअर्जदाराने त्याचे उत्पन्न व दायित्ताचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र. १२ मध्ये परिच्छेद क्र. ८ F (१) मध्ये त्याला ए.एस.एम. एनर्जी या फर्म व्यवसायापासुन ₹ ५०,०००/– ते ₹ ७०,०००/– दरमहा उत्पन्न मिळत असल्याचे मान्य केलेले आहे. तसेच त्याने सदर व्यवसायाकरिता पिरॅमल कॅपिटल फाईनांसकडून ₹ ३०,००,०००/– (तीस लाख रुपये) चे कर्ज त्याच्या वडीलांच्या नावाने घेतल्याचे, सदर फायनन्स कपंनीचा तो दरमहा ₹ ४१,०००/– कर्ज हप्ता भरत असल्याचे, सदर व्यवसायासाठी त्याने पुणे येथे एक ऑफिस भाड्याने घेतले असुन त्याचे भाडे ₹ १२,५००/– असल्याचे, दोन कामगारांचे पगारासाठी दरमहा ₹ १८०००/– द्यावे लागत असल्याचे व सदरहू फर्म मागील वर्षीच चालू केली असल्यामुळे त्यापासून आज रोजी त्याला कोणतेही उत्पन्न नसल्याचे व त्याच्यावर त्याच्या

आईवडिलांची जबाबदारी असल्याचे नमुद केलेले आहे. त्याने सदर प्रतिज्ञापत्रात पुढे असेही नमुद केलेले आहे की, अर्जदार बी. एच. एम. एस झालेली असून, उच्च शिक्षित महिला आहे व ती स्वतःचा उदरनिर्वाह करु शकते.

३५. अर्जाकामी अर्जदाराचे मा. विधीज्ञ ***दिपा जोशी विरुध्द गौरव जोशी (२०२६ AIR सुप्रिम कोर्ट २०१३)*** या निवाड्यावर विसंबुन आहे. या प्रकरणामध्ये पतीचे उत्पन्न दरमहा ₹ १,१५,६७०/– असे होते व कर्जापोटी त्याचे उत्पन्नातुन रक्कम कपात होत होती. सदर प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयाने असे प्रमाण दिले आहे की, पत्नीला उत्पन्नाचे स्वतंत्र साधन नसल्यास तिला अन्नवस्त्र खावटी देण्याची पतीची प्राधान्यक्रमाने व सातत्यपुर्ण कायदेशिर जबाबदारी असते. अन्नवस्त्र व खावटीची रक्कम ठरविताना ती रक्कम अर्जदाराला सन्मानाने जगता येईल अशाप्रकारे योग्य व वाजवी आणि अर्जदार व गैरअर्जदार यांच्या राहणीमानाशी सुसंगत असावी. कर्जापोटी किंवा संपत्ती निर्माण करण्यासाठी पतीच्या उत्पन्नातुन परतफेडीसाठी कपात होणा–या रक्कमा ह्या स्वेच्छेच्या आर्थिक बांधीलक्या असून त्या पतीच्या खावटी देण्याच्या प्राथमिक कायदेशिर कर्तव्यावर प्राधान्य मिळवु शकत नाही.

३६. प्रस्तुत प्रकरणातदेखील गैरअर्जदाराने त्याला कर्जाचे हप्ते भरावे लागत असल्याबाबत त्याच्या उत्पन्न व दायित्वाच्या प्रतिज्ञापत्रात या अगोदर वरिलप्रमाणे नमुद केलेले आहे. परंतु त्याकारणास्तव तो अर्जदाराला अन्नवस्त्र खावटीची रक्कम देण्याचे नाकारू शकत नाही. त्यामुळे प्रस्तुत

प्रकरणातदेखील ***दिपा जोशी (वरिलप्रमाणे)*** या न्यायनिर्णयातील प्रमाण लागु होते.

३७. अभिलेखावरील पुराव्यावरुन असे निष्पन्न होते की, गैरअर्जदार याचे शिक्षण अभियांत्रिकी पदवीपर्यंत झालेले आहे. त्याला त्याच्या व्यवसायापासुन दरमहा ₹ ५०,०००/– ते ₹ ७०,०००/– उत्पन्न मिळत असुन त्याच्यावर त्याच्या आईवडिलांच्या पालनपोषणाची जबाबदारी आहे. या ठिकाणी हेदेखील नमुद करणे महत्त्वाचे आहे की, अर्जदार हिचेदेखील होमिओपॅथिक वैद्यक व शल्यचिकित्सा पदवीपर्यंत (बी.एच.एम.एस.) शिक्षण झालेले आहे. म्हणजेच अर्जदारदेखील उच्चशिक्षित आहे. म्हणजेच तीदेखील स्वतःसाठी थोडेफार कमावु शकते. तिच्यावर इतर कोणाचीही जबाबदारी नाही. त्यामुळे अशा परिस्थितीत अर्जदारास अर्ज दाखल तारखेपासुन रक्कम ₹ १५,०००/– दरमहा अन्नवस्त्र व खावटीची रक्कम देण्याबाबत गैरअर्जदाराला आदेश करणे न्यायोचित होईल. त्यामुळे मुद्दा क्र. ०१ ते ०३ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदविण्यात येते व मुद्दा क्र. ०४ चा निष्कर्ष वरिलप्रमाणे अंशत: होकारार्थी नोंदविण्यात येतो व मुद्दा क्र. ०५ च्या निष्कर्षाकरिता खालील आदेश पारित करण्यात येतो.

## आ दे श

१) अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

२) गैरअर्जदार याने अर्जदार हिला दरमहा रक्कम ₹ १५,०००/– (अक्षरी ₹ पंधरा हजार मात्र) दरमहा अन्नवस्त्र व खावटीची रक्कम म्हणुन अर्ज दाखल तारखेपासून द्यावेत.

३) अर्जाच्या खर्चापोटी गैरअर्जदार याने अर्जदार हिला रक्कम ₹ २,०००/- (अक्षरी ₹ दोन हजार मात्र) द्यावेत.

४) या न्यायनिर्णयाची प्रत अर्जदारास विनामुल्य पुरविण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

Digitally signed by PANDIT DAGU DEORE
Date: 2026.08.01 17:58:04 +0530

कारंजा लाड **( पी. डी. देवरे)**

दिनांक – ०१/०८/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
कारंजा (लाड)

| **CERTIFICATE** | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. file Judgment is same word to word as per the original Judgment. | | |
| Name of Stenographer | :- | **Shivam B. Patange (L.G.)** |
| Court Name | :- | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Karanja. |
| Date of Judgment | :- | 01.08.2026 |
| Judgment signed by P.O. | :- | 01.08.2026 |
| Judgment uploaded on | :- | 01.08.2026 |